# *जिल्हा परिषद पदभरती सन २०२३-२४ बाबत महत्त्वाची सुचना*

*दिनांक १६ जून २०२४ ते २१ जून २०२४ या कालावधीत **आरोग्य सेवक( महिला) तसेच कंत्राटी ग्रामसेवक** या पदाचे परीक्षा नियोजित आहेत. त्याअनुषंगाने **महिला उमेदवारांचे लक्ष जिल्हा परिषद रायगड पदभरती जाहिरात दिनांक ०५/०८/२०२३ मधील मुद्दा क्रमांक ४.६ (ओळख पटवणे) कडे वेधण्यात येत आहे.** परीक्षा केंद्रावर येतांना केंद्रावरील प्रवेशाबाबत स्पष्ट पणे नमुद केले आहे की, **ज्या महिला उमेदवारांच्या पहिल्या/मधल्या/शेवटच्या नावात विवाहानंतर फरक पडला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. जर प्रवेशपत्रावरील फोटो/नांव आणि ओळखपत्रावरील फोटोत/नावात कोणताही फरक/विसंगती असेल तर अशा उमेदवारास परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही. ज्या उमेदवारांनी आपल्या नावांत बदल केला असेल अशा उमेदवारांनी मुळ राजपत्रित अधिसुचना किंवा मुळ विवाह प्रमाणपत्र प्रस्तुत केले तरच त्यांना परीक्षेसाठी प्रवेश देण्यांत येईल. ज्या महिला उमेदवारांचे नावात विवाहानंतर बदल झाला असेल त्यांनी याबाबत विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे. परीक्षा केंद्रावर प्रवेशाकरिता अलीकडच्या काळातील फोटो असलेले वैध फोटो ओळखपत्र जसे पॅन कार्ड(Pan Card) / पारपत्र(Passport) / वाहन चालक परवाना(Driving Licence) / मतदार ओळखपत्र(Voter Id) / आधार कार्ड, बँक/पोस्ट फोटोसहीतचे पासबुक/फोटोसहीत असणारे नोंदणीकृत विद्यापीठ/कॉलेज चे फोटोसहीत ओळखपत्र/बार कौन्सिलचे ओळखपत्र हे केंद्रावरील समवेक्षक/पर्यवेक्षकाला सादर करावे** लागतात. **त्यामुळे उमेदवारांचे प्रवेशपत्रावरील नाव व लग्नानंतरचे नाव यामध्ये तफावत असल्यास त्याबाबत जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे परीक्षा केंद्रावर पुरावा सादर केला नसल्यास त्यांचे परीक्षा केंद्रावरील प्रवेशाकरीता संबंधित ओळखपत्र ग्राह्य धरले जाणार नाही. तसेच विवाहित महिला उमेदवारांचे बाबतीत प्रवेशपत्र(Hallticket) वर लग्नापूर्वीचे नाव असेल व पॅन कार्ड वर लग्नानंतरचे नाव व वडिलांचे पूर्ण नाव असले तरी सदर पॅनकार्ड ओळखपत्र म्हणून ग्राह्य धरले जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. अशा परिस्थितीत संबंधित उमेदवारांना मूळ विवाहप्रमाणपत्र किंवा नावांत बदल केल्याबाबतची राजपत्रित अधिसुचना सादर करणे अनिवार्य राहील.***

***त्यामुळे उमेदवारांना याद्वारे आवाहन करण्यांत येते की, ओळखपत्रावरील नाव व प्रवेशपत्रावरील नाव हे सारखे असेल असे ओळखपत्र परिक्षा केंद्रावर परीक्षेचे वेळेस सादर करावे.** तसेच परीक्षेचे प्रवेशपत्र व सादर करण्यांत आलेले फोटो ओळखपत्र यामधील नावात कोणतीही तफावत आढळल्यास उमेदवाराचे केंद्रावरील प्रवेश नाकारण्यांत येईल.*

***रेशनकार्ड, शिकाऊ वाहन परवाना हे ओळखपत्र म्हणून ग्राह्य धरता येणार नाही.** तेव्हा जाहिरात व प्रवेशपत्र यातील सर्व सुचनांचे बारकाईने अवलोकन करूनच उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावे.*

*स्वाक्षरी/-*

*दिनांक: १४/०६/२०२४*
*ठिकाण: रायगड*

***(डॉ.भरत बास्टेवाड)** भा.प्र.से*
***मुख्य कार्यकारी अधिकारी***
***रायगड जिल्हा परिषद, अलिबाग***